महाळुंगे एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय
पत्ता- महाळुंगे (इंगळे), ता-खेड, जि-पुणे ४१०५०१
मेल आय.डी. pimahalunge.pcpc-mh@gov.in

## प्रेस नोट

दिनांक ०१/०२/२०२५

**टी शर्ट व चालण्यातील लकबीचे आधारे चार महिने अथक प्रयत्न करुन घरफोडी करणारा चोरटा गजाआड महाळुंगे तपास पथकाची कारवाई : १८ लाख रुपयांचे २६ तोळे सोन्याचे दागिने जप्त**

---

मौजे रोजी कुरूळी ता- खेड जि-पुणे येथील श्री अरविंद प्रकाश कसाळे हे त्यांचे कुटुंबीयांसह दिनांक २०/०९/२०२४ रोजी सकाळी ११:३० ते १२:४५ वा चे दरम्यान कामानिमीत्ताने घराबाहेर गेले असता अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे घराचे दरवाजाचा कडी कोयंडा तोडुन फिर्यादीचे घरातील कपाटातुन २६ तोळे सोन्याचे दागिने घरफोडी चोरी करुन चोरुन नेले होते. सदर चोरी संदर्भाने महाळुंगे पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नंबर ६४३/२०२४ भा.न्या.सं.कलम ३३१(३), ३०५(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयामध्ये मध्यमवर्गीय कुटुंबीयांचे घरातुन मोठया किंमतीचे सोन्याचे दागिने चोरीस गेले असल्याने मा.पोलीस आयुक्त श्री विनय कुमार चौबे, पोलीस उप-आयुक्त डॉ.शिवाजी पवार यांनी गुन्हयातील चोरटयाचा शोध घेवुन गुन्हा उघकीस आणण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार श्री नितीन गिते, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, महाळुंगे पोलीस स्टेशन यांच मार्गदर्शन व सुचना प्रमाणे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे फिर्यादी यांचे घराचे परिसरात वावरणारे संशयीत व्यक्तीविषयी माहिती प्राप्त करत होते. त्या दरम्यान फिर्यादी यांचे घराचे परिसरात एक व्यक्ती संशयीतरित्या वावरतात असताना सी.सी.टी.व्ही.फुटेज मध्ये आढळुन आला. त्याची ओळख पटत नसल्याने त्याचे विषयी माहिती प्राप्त होण्यास अडचणी येत होत्या. तपास पथकामधील अधिकारी व अंमलदार यांनी संशयीत व्यक्ती प्रमाणे दिसणारे अनेक व्यक्तींकडे तपास केला, मात्र त्यात यश येत नव्हते

सदर संशयीत व्यक्तीची शरीरयष्टी व त्याचे चालण्याची लकब याचा अभ्यास करुन तपास पथकाचे अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक श्री कल्याण घाडगे व अंमलदार हे गुन्हा उघडकीस आणण्याचे निश्चयाने संशयीत व्यक्तीचा वेगवेगळया भागात शोध घेत होते. दिनांक १४/०१/२०२५ रोजी तपास पथकाचे पोलीस अंमलदार श्री गणेश गायकवाड हे परेड करुन परत कर्तव्यावर येत असताना स्पाईन रोड परिसरात त्यांना वरील संशयीत व्यक्ती प्रमाणे एक इसम दिसुन आला. त्यास तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांचे मदतीने ताब्यात घेवुन त्याचेकडे कौशल्यपुर्ण तपास करता त्याने गुन्हयाची कबुली दिली व गुन्हयातील चोरलेले दागिने त्याचे मुळगावी मौजे ढाका, जि मोतीहारी, बिहार येथे विकले असल्याचे सांगितले. त्यानुसार बिहार येथील नेपाळ सिमेवरील दुर्गम ठिकाणी जावुन दागिने खरेदी करणारे व्यक्तीस ताब्यात घेवुन दोन्ही आरोपींकडे तपास करण्यात आला व त्यांचेकडुन चोरलेले १८ लाख रुपये किंमतीचे २६ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.

**अटक आरोपींची नावे :-**

१) **टुल्लुकमार रामुराउत वय २५ वर्ष**, हल्ली रा-पवारवस्ती चिखली, पुणे मुळ रा-सराटा ढाका, बिहार.
२) **बालेश्वर प्रसाद नंदलाल साह, वय ४५ वर्ष,** रा बखरी खजुरी, ढाका, जि मोतीहारी बिहार.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त **श्री.विनय कुमार चौबे,** मा.सह पोलीस आयुक्त **डॉ.शशिकांत महावरकर,** मा.अपर पोलीस आयुक्त **श्री.वसंत परदेशी,** मा.पोलीस उप-आयुक्त, गुन्हे शाखा **श्री.संदिप डोईफोडे,** मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-३, **डॉ.शिवाजी पवार,** सहाय्यक पोलीस आयुक्त, चाकण विभाग **श्री.राजेंद्रसिंह गौर,** यांचे सुचना व मार्गदर्शनानुसार महाळुंगे पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक **श्री नितीन गिते,** पोलीस निरीक्षक(गुन्हे) **प्रविण कांबळे,** सहायक पोलीस निरीक्षक **श्री कल्याण घाडगे**, पोलीस अंमलदार **राजु कोणकेरी, युवराज बिराजदार, तानाजी गाडे, विठ्ठल वडेकर, अमोल बोराटे, किशोर सांगळे, संतोष काळे, गणेश गायकवाड, शिवाजी लोखंडे, संतोष वायकर, राजेंद्र खेडकर, अमोल माटे, मंगेश कदम, शरद खैरे**, **राजेश गिरी,** तसेच पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ ३ यांचे कार्यालयकडील सहा.फौजदार राजु जाधव यांनी केली आहे. सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शोध पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक **श्री कल्याण घाडगे** हे करत आहेत

(नितीन गिते)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे,